

छाया: ए. एल. सैयद

निरागस नरगीस

हिंदीत राज कपूरबरोबर रोमॅण्टिक हिट जोडी बनवलेल्या नरगीसने *मदर इंडियात* साकारलेली भूमिका बॉलीवूडच्या स्त्री व्यक्तिरेखांत सर्वाधिक प्रशंसनीय होती. खासगी जीवनातही एक प्रेमळ पत्नी आणि आई बनून तिने चाहत्यांचं प्रेम मिळवलं. पाचव्या वर्षी बेबी रानी नावाने इंडस्ट्रीत आलेल्या नरगीसने *आग, मेला, आझाद, बाबूल, जोगन, आवारा, दीदार, बरसात, चोरी चोरी*सारखे अप्रतिम चित्रपट दिले. *रात और दिन*साठी तिला १९६७चा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. नरगीसच्या या छायाचित्रातले निरागस भाव अखेरपर्यंत तिच्या चेहऱ्यावर होते.



नरगिसचं हे सौंदर्य टिपणारे ए. एल. सैयद तत्कालीन राजे-महाराजे, सरदार आणि इंडस्ट्रीतल्या आघाडीच्या कलाकारांचे लाडके फोटोग्राफर होते. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त फेब्रुवारीत त्यांचं जन्मगाव पालनपूर येथे फोटोचं प्रदर्शन आयोजित करण्यात आलं. तसंच स्मरणिकाही प्रकाशित करण्यात आली. संपर्क:- ए.ए.सैयद (०२७४२-२४६७९५)